27/01/22

# University of Mumbai

अवैध साधन चौकशी विभाग,
परीक्षा भवन, महात्मा जोतिराव
फुले भवन, विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८

क्र.परीक्षा/अवैध साधन/ ८१ /२०२२

परिपत्रक :–

विषय: अवैध साधन प्रकारच्या केसेस (Unfair Means Cases) हाताळताना घेण्याची काळजी.

सर्व प्राचार्य, संलग्नीत शासकीय/ अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी व्यवस्थापन संस्था, औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालये व संस्था संचालक/विविध विभाग प्रमुख, विद्यापीठाचे विविध विभाग, यांना कळविण्यात येते की, अवैध साधन प्रकारच्या केसेस (Unfair Means Cases) हाताळताना खालील प्रमाणे काळजी घेण्यात यावी किंवा हाताळाव्यात.

१. परीक्षा सुरु होण्याआधी सर्व विद्यार्थ्यांना आपल्याकडील सर्व वस्तू ज्या परीक्षेचा पेपर लिहितांना जवळ बाळगण्यास सक्त मनाई आहे अशा वस्तू बाजूला ठेवण्यास सांगावे.
(उदा.मोबाईल फोन, खिशात पाठांतरासाठी आणलेल्या चिठ्ठया व अवैध साधन सामुग्रीचा वापर करण्यासाठी आणलेल्या सर्व वस्तू).

२. परीक्षा सुरु झाल्यानंतर कोणाकडेही वरील वस्तू सापडल्यास आपली चौकशी करण्यासाठी विद्यापीठाकडे आपली उत्तरपुस्तिका व अवैध साधन प्रकारातल्या मिळालेल्या वस्तू पाठविण्यात येतील असे सांगावे.

३. मोबाईल परीक्षा गृहात आणण्यास पूर्णता बंदी आहे असे सांगावे.

तसेच पुढे असेही कळविण्यात येते की, परीक्षार्थींना पुरविण्यात आलेल्या उत्तरपत्रिकांवर नमुद असलेला संगणीकृत बारकोडस्वर pin staple तसेच खाडाखोड/क्रश करु नये अशा सुचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

४. वरील सर्व गोष्टी सांगून सुध्दा अवैध साधन सामुग्रीचा वापर करतांना (Copying) विद्यार्थी सापडल्यास खालील गोष्टी कराव्यात :-

१. प्रथम त्या विद्यार्थ्यांकडील त्याची उत्तरपुस्तिका व अवैध साधन प्रकारातील वस्तू काढून घ्याव्यात नंतर आपल्याकडे असलेला अधिनियम ५०५० मधील फॉर्म वापरावा.(www.mu.ac.in-Circular- Circular related to Ordinance- Ordinance O. 5050)

२. कनिष्ठ व वरिष्ठ पर्यवेक्षकांनी सदर विद्यार्थ्यांकडून खालील प्रमाणे लिहून घ्यावे.

१. विद्यार्थ्याचे पूर्ण नाव
२. विद्यार्थ्यांचा पूर्ण पत्ता पिन कोड सहित
३. विद्यार्थ्यांचा बैठक क्रमांक
४. विद्यार्थ्यांच्या कोर्सचे नाव सत्रा सहित
५. विद्यार्थ्यांचे कॉलेजचे नाव
६. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक आणि घरचा फोन नंबर
७. विद्यार्थ्यांचा ई-मेल

-२/-

८. विद्यार्थ्याचा मोबाईल पाठवून देणे (कॉपी पकडली असेल तर)

९. विद्यार्थ्याचे कॉपी साहित्य

१०. विद्यार्थ्याकडे सापडलेल्या वस्तूवर विद्यार्थ्याची सही घ्यावी

११ विद्यार्थ्याची स्टेटमेंट

१२. विद्यार्थ्याचे प्रवेश प्रत व ओळखपत्राची प्रत

३. वरील सर्व गोष्टी विद्यार्थ्याकडून लिहून घेतल्यानंतर कनिष्ठ पर्यवेक्षक, वरिष्ठ पर्यवेक्षक व प्रमुख मार्गदर्शक यांनी स्वतःचा शेरा फॉर्म मध्ये नमूद करावा. व नंतर सदर विद्यार्थ्यास पुन्हा तीच उत्तरपुस्तिका लिहिण्यास देण्यात यावी वेगळी उत्तरपुस्तिका देऊ नये जेणेकरुन गोधंळ होणार नाही व बचत होण्यास मदत होईल. चुकून नवीन उत्तरपुस्तिका दिल्यास दोन्हीही उत्तरपुस्तिका एकाच लिफाफ्यात पाठवावेत त्याचप्रमाणे उत्तरपुस्तिकेवरील OMR फाडू नये, जेणेकरुन विद्यार्थ्याचा परीक्षा क्रमांक समजण्यास सोपे जाईल.

४. शेवटी परिक्षा संपल्यानंतर सदर विद्यार्थ्याचा पेपर, लिहून घेतलेले फॉर्म व सदर विद्यार्थ्याकडे सापडलेल्या अवेध साधन प्रकारातील वस्तू, कनिष्ठ व वरिष्ठ पर्यवेक्षकांचा अहवाल एका वेगळया लिफाफ्यात भरुन लिफाफ्यावर (Unfair Means Case) असे लिहुन विद्यापीठाकडे संचालक परिक्षा व मुल्यमापन मंडळ यांच्या नावाने पुढील चौकशीसाठी पाठवावे.

५. विद्यार्थ्याने बाक, हात, स्वतःचे कपडे यांच्यावर पेपर संदर्भात लिहिलेले असल्यास सदर वस्तूचा फोटो काढावा व त्यावर विद्यार्थ्याची सही घेऊन ती उत्तरपुस्तिका सदर केस सोबत पाठवावी.

६. विद्यार्थ्यांकडे मोबाईल, कॅल्क्युलेटर तसेच इतर तत्सम इलेक्ट्रानिक्स वस्तू सदर उत्तरपुस्तिकेसोबत पाठवाव्यात

वरील परिपत्रकाचे नियम काटेकोरपणे पाळावे जेणेकरुन वरील केसेस हाताळताना मुंबई विद्यापीठाला पुढील प्रक्रिया करणे सोपे जाईल.

(डॉ. विनोद पाटील)
संचालक
परिक्षा व मुल्यमापन मंडळ

मुंबई. ४०० ०९८
दिनांक : २७ एप्रिल, २०२२